महाराष्ट्र टाइम्स
औरंगाबाद, मंगळवार, २८ जानेवारी २०१४ ◆ पाने २० (औरंगाबाद टा

# विविध संस्था, संघटनांच्यावतीने प्रजासत्ताक दिन उत्साहात

## राष्ट्रीय बाल कामगार शाळा

राष्ट्रीय बाल कामगार शाळेच्या भावसिंगपुरा व पडेगाव येथील दोन्ही शाखेत आझाद अली शाह एज्युकेशन सोसायटीचे प्रशासकीय अधिकारी साजेद पाशा यांच्या हस्ते ध्वजवंदन झाले. राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हा सरचिटणीस राजेंद्र दुबे व अॅड. शेख फेरोज प्रमुख पाहुणे होते. माया आवाड यांनी सूत्रसंचालन केले. नंदा सुरडकर, शेख तमन्ना, आशा साळवे, शेख शमशाद, गोदावरी कलसरे, शेख रिजवाना, मीना भालेराव यांनी परिश्रम केले.

दैनिक राजसम्राट
मंगळवार, दिनांक २८ जानेवारी २०१४

# राष्ट्रीय बाल कामगार शाळेत प्रजासत्ताक दिन साजरा



औरंगाबाद (प्रतिनिधी)- आझाद अली शाह शिक्षण संस्थेद्वारे कासीम बरी दर्गा, पडेगाव व लाल माती भावसिंगपुरा या दोन्ही शाळेच्या वतीने भावसिंगपुरा येथे ध्वजारोहण समारंभ प्रजासत्ताक दिनानिमित्त अतिशय हर्ष, उल्हासात व आनंदमय वातारणात सकाळी साडेसात वाजता आझाद अली शाह शिक्षण संस्थेचे प्रशासकीय अधिकारी खन साजिद पाशा यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष राजेंद्र दुबे हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून अॅड. शेख फेरोज हे होते.

यानंतर अॅड. शेख फेरोज यांनी बालकामगार प्रकल्प म्हणजे काय व बालमजुरी म्हणजे काय हे दुरून जानण्याचा विषय नसून तो आझाद अली शाह संस्था ज्या पध्दतीने काम करत आहे. तसे जवळ जावून काम करून कळून घेण्याचा विषय आज या कार्यक्रमाला उपस्थित झाल्यानंतर मला कळाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सायमा खान यांनी केले तर आभार प्रदर्शन माया आवाड यांनी केले. पाहुण्यांचा परिचय नंदा सुरडकर यांनी केला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेचे शेख, आशा साळवे, शेख शमशाद, गोदावरी कलसरे, शेख रिजवाना, मिना भालेराव आदींनी परिश्रम घेतले.